# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## प्रकटन

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत.**

---

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दि.२/७/२०२१ च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दती जाहीर केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील, सूचना व वेळापत्रक मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले असून त्याची कार्यपध्दती तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेसाठी मंडळाकडे शाखानिहाय नोंदणी केलेल्या नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट विद्यार्थी यांचे मूल्यमापनाबाबतचा तपशील व विषयनिहाय परिशिष्टे याबाबतचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तरी, सदर मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील, सूचना, मूल्यमापनाबाबतचे विषयनिहाय परिशिष्टे व वेळापत्रक इ.बाबतचे परिपत्रक व परिशिष्टे याची सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य व शिक्षक यांनी नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. तसेच शासन निर्णय व उपरोक्त परिपत्रकानुसार इ.१२ वीच्या मूल्यमापन कार्यपध्दती संदर्भात प्रशिक्षणाचा व्हिडीओ मंडळाच्या यु-टयुब चॅनेलवर http://mh-hsc.ac.in/faq या लिंकवर दि.०७/०७/२०२१ रोजी स. ११.०० पासून उपलब्ध करुन दिलेला आहे.

तरी, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/ प्राचार्य व संबंधित शिक्षक यांनी त्यानुसार प्रशिक्षण घेऊन पुढील कार्यवाही करावी.

दि.०६/०७/२०२१

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे -०४